# मिरा भाईंदर महानगरपालिका

## परवाना विभाग

## || जाहीर आवाहन ||

**आस्थापनेंचा नामफलक मराठी भाषेत लावणेबाबत...**

संदर्भ :- 1. मा.उच्च न्यायालय दि.23/02/2022 रोजीचा निर्णय.

2. मा.सर्वोच्च न्यायालय दि.25/09/2023 रोजीचा आदेश.

3. महाराष्ट्र शासन राजपत्र (उद्योग उर्जा व कामगार विभाग) दि.22/02/2023.

उपरोक्त संदर्भान्वये मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तसेच महाराष्ट्र श्शासनाकडील उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या राजपत्रान्वये महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन, अधिनियम 2017 क्रमांक मदुवआ-06/2022/प्र.क्र.100/कलम-10-व्दारे दि.22/02/2023 पासुन त्यांच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्रांमध्ये नामफलक मराठी भाषेत असण्या संबंधित असणाऱ्या उक्त अधिनियमाच्या कलम 36 (क)च्या तरतुदनुसार आस्थापनेंचा नामफलक मराठी भाषेत लावणे बंधनकारक केले आहे.

सबब सदर अधिनियमानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका शहारातील सर्व आस्थापना धारकांनी त्यांच्या दुकानांवरील आस्थापनांचे नामफलक मराठी भाषेत करणे अनिवार्य आहे. ज्या आस्थापनांचे नामफलक मराठी भाषेत आढळणार नाहीत त्यांच्या आस्थापनेवर मा.न्यायालयाच्या आदेशान्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व दुकाने,आस्थापना, वाणिज्यिक संस्था, हॉटेल्स इत्यादींना महानगरपालिकातर्फे जाहिर आव्हान करण्यात येते, नामफलक मराठी भाषेत करणेत यावे. ज्या आस्थापनांचे नामफलक मराठी भाषेत नसतील अशा आस्थापना धारकांना मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्यांच्या आस्थापनांवर प्रत्येक कामगार(प्रमाणे रु 2000 अशी दंडात्मक कारवाई महानगरपालिकातर्फे करण्यात येईल. याची स्पष्ट नोंद घ्यावी.

संजय शिंदे<br>
उप-आयुक्त (परवाना)<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका.